**<u>निशाणी क्र.४८ वर आदेश</u>**
**(पारित दिनांक २३.०३.२०२६)**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दावा मिळकतीबाबत जैसे थे परिस्थिती राखण्याचा आदेश पुढे सलग करण्यात यावा या करिता केला आहे.

२. वादीच्या कथनाप्रमणे, नि.क्र.२१ वर दावा मिळकतीची परिस्थिती जैसे थे ठेवणेबाबत मे. न्यायालयाने आदेश केला आहे. सदरील आदेश आजपावेतो कायम आहे. तो कायम ठेवल्यास प्रतिवादीचे काही एक नुकसान होणार नाही. परंतु, कायम न केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, सदरील आदेश कायम ठेवण्यात यावे अशी विनंती वादीने केली.

३. प्रतिवादीतर्फे अर्जाच्या पाठीमागील बाजूस म्हणणे दाखल असून त्याद्वारे त्यांनी आजरोजी कैफियत व म्हणणे दाखल केलेले आहे. अल्प मुदत देण्यास हरकत नाही असे म्हणणे दिले.

४. उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकला. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वादीने प्रस्तुतचा दावा जाहिर ठराव होऊन मिळणेसाठी व अनुषंगिक दाद म्हणून निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केला आहे. सदर दाव्याचे कामी न्यायालयाने दिनांक १८.१२.२०२४ रोजी निशाणी २१ वर आदेश पारित करुन प्रतिवादींविरुध्द एकतर्फा अंतरी स्थगीती आदेश पारित केला होता. सदरचा आदेश वेळोवेळी दाखल अर्जान्वये पुढे संलग्न केला होता. सदरील आदेशाप्रमाणे दावा मिळकतीची स्थिती पुढील तारखेपर्यंत कायम ठेवण्याचा आदेश केला होता. प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केल्यास दावा मिळकतीची स्थिती आहे त्या स्वरुपात राहिल की नाही याबाबत साशंकता निर्माण होते. निशाणी क्र.५ वरील अर्जाचे

गुणावगुणावर कामकाज चालून न्यायनिर्णय होणेकरता प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

**५.** प्रस्तुतचा अर्ज नामंजूर झाल्यास प्रतिवादींचे नुकसान होणार नाही परंतु वादीचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. सबब, वर नमूद विवेचनाअंती मी पुढील आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. दिनांक १८.१२.२०२४ रोजी पारित करण्यात आलेला एकतर्फा अंतरिम स्थगिती आदेश पुढील तारखेपर्यंत संलग्न करण्यात येत आहे.

३. उभयपक्षकरांनी आदेशाची नोंद घ्यावी.

GHORPADE PRIYA BALASAHEB

Digitally signed by GHORPADE PRIYA BALASAHEB
Date: 2026.03.23 17:21:11 +0500

**(श्रीमती पी. बी. घोरपडे)**

**दिनांक : २३.०३.२०२६** **७वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पंढरपूर.**